**SET – 4**

**Series : HRK/C**

कोड नं.
**Code No. 8**

रोल नं.
**Roll No.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

परीक्षार्थी कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।

Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में मुद्रित पृष्ठ **7** हैं ।
- प्रश्न-पत्र में दाहिने हाथ की ओर दिए गए कोड नम्बर को छात्र उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर लिखें ।
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में **10** प्रश्न हैं ।
- **कृपया प्रश्न का उत्तर लिखना शुरू करने से पहले, प्रश्न का क्रमांक अवश्य लिखें ।**
- इस प्रश्न-पत्र को पढ़ने के लिए 15 मिनट का समय दिया गया है । प्रश्न-पत्र का वितरण पूर्वाह्न में 10.15 बजे किया जाएगा । 10.15 बजे से 10.30 बजे तक छात्र केवल प्रश्न-पत्र को पढ़ेंगे और इस अवधि के दौरान वे उत्तर-पुस्तिका पर कोई उत्तर नहीं लिखेंगे ।
- Please check that this question paper contains **7** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **10** questions.
- **Please write down the Serial Number of the question before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# संकलित परीक्षा – II

## SUMMATIVE ASSESSMENT – II

# मराठी

## MARATHI

*वेळ : 3 तास* | *गुण : 90*

*निर्धारित समय : 3 घंटे* | *अधिकतम अंक : 90*

*Time allowed : 3 hours* | *Maximum Marks : 90*

## Section – A

1. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा :

दूरवरून पाण्याचे हंडे भरून ते डोक्यावरून आणण्याचे कष्ट नाहीसे व्हावेत म्हणून घराघरात नळ पोचवण्याची जी आधुनिक पाणी वितरण प्रणाली, तिचा आपण लोककल्याणाचा भाग म्हणून विस्तार करीत आहोत. पण पाण्याच्या अशा सुलभ उपलब्धतेतून समाजात एक वेगळी अज्ञानी व बेधुंद अशी 'नळसंस्कृती' उदयाला आली आहे. पाण्याचा मूळ स्रोत काय व त्याच्या मर्यादा काय, वास्तव खर्च काय, याची काहीही माहिती विशेषतः महानगरीय पाणी वापरणाऱ्याला नसल्याने त्या पाण्याच्या काटकसरीची व संयमित वापराची जाणीव निर्माण होत नाही. तोटी उधडताच नळाला येऊ शकणाऱ्या धोधो पाण्यामुळे वास्तविक गरजेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात पाण्याचा अतिरेकी वापर स्वच्छतेसाठी, आंघोळीसाठी, वाहने धुण्यासाठी करण्याची सवय नागरिकांना लागत आहे. त्याच्याशी प्रतिष्ठा निगडित करण्याची अहितकारक मानसिकताही वाढीस लागली आहे. तिला वळण लावण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागणार आहेत.

शासनाने निर्धारित केलेल्या 150 लिटर किंवा 135 लिटर प्रतिमाणशी अशा मापदंडापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात पाणीवापराची सवय काही समाजघटकां ना जडली आहे. मुंबई – पुणे शहरांमध्ये 200 लिटर ते 300 लिटर पाण्याचा अनिर्बंध सर्रास वापर करणारी कित्येक नागरी क्षेत्रे आहेत.

(1) 'पाणी वितरण प्रणाली' म्हणजे काय ? **1**

(a) पाणी देण्याचा समारंभ

(b) पाणीवाटपाचे धोरण

(c) पाणीवाटपाची व्यवस्था

(d) पाणी वाहून जाण्याची व्यवस्था

(2) पाण्याच्या काटकसरीची जाणीव कोठे निर्माण होत नाही ? **1**

(a) खेड्यापाड्यात

(b) डोंगरदऱ्यांमध्ये

(c) महानगरांत

(d) रानावनात

(3) 'नळसंस्कृती' चे स्वरूप कसे आहे ? **3**

(4) मुंबई–पुणे शहरांमधील लोकांचा पाण्याचा वापर कशा प्रकारचा असतो ? **3**

2. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.

माणसांना लागते तशी झाडां नाही दृष्ट लागते, है आईचे शास्त्र. तिच्या मते, फळांनी लगडलेल्या फणसाला वाटेने जात्यायेत्या पाप्याची अद्रुण नजर बाधते. मग आई फणसाच्या बचावासाठी युक्ती योजते. आमच्या तुटक्या वहाणा ती वर्षभर जमवून ठेवते नि फणसाचा हंगाम सुरू झाला की, त्याच्या फांदीफांदीला एकेक तुटकी वहाण कुणाकडून तरी बांधून घेते. त्या वहाणेचा तळ तेवढा पाहणाऱ्याला दिसेल अशा बेताने. मग ते सुंदर झाड एकदम चमत्कारिक दिसू लागते. एखाद्या खुळया माणसासारखे. आम्हाला त्या वहाणा मुळीच आवडत नाहीत. पण आईचा राग पत्करून त्या वहाणा काढून कुणी टाकायच्या ?

मिरग जवळ येतो. घरातले धान्य संपते. उपासमारीने पोटे खपाटीला जातात. नि मग फणसाचे झाड मंगळवेढ्याचा दामाजी बनून कुळवाड्याच्या भेटीस येते. ह्या कठीण दिवसांत दरिद्री कोकणदेशातल्या कुळवाड्यांना फणसाच्या झाडाचा आधार नसेल तर हाहाकार माजेल. दारातील दोन झाडे उभे घर जिवंत ठेवीत असतात. सकाळी उठल्याबरोबर न्याहरीला कापा फणस, दुपारी जेवतेवेळी रसाळ फणस नि फणसाच्या मीठ घालून उकडलेल्या आठल्या. रात्री भाताची पेज नि फणसाच्या गऱ्यांची भाजी. हा या दिवसांतला पोटभरू आहार. म्हणून कुळवाड्याच्या मुंबईच्या चाकरमान्याची चाकरी सुटल्याचे दुःख होत नाही, पण फणसाला फळे लागली नाहीत तर मात्र तो खुळापिसा होतो.

(1) 'अद्रुण' नजर म्हणजे काय ? **1**

(a) तीक्ष्ण नजर

(b) तिरकी नजर

(c) अशुभ नजर

(d) प्रेमभरी नजर

(2) फणसाचे सुंदर झाड एकदम चमत्कारिक का दिसू लागते ? **1**

(a) फळांनी लगडल्यामुळे

(b) पालवी फुटल्यामुळे

(c) लटकणाऱ्या वहाणांमुळे

(d) वटवाघळांमुळे

(3) फणसाचे झाड मंगळवेढ्याचा दामाजी कसे बनते ? **3**

(4) कोकणचा कुळवाडी केव्हा खुळापिसा होतो ? **3**

## Section – B

3. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **25** ते **30** ओळी निबंध लिहा. **10**

(1) निर्व्यसनीपणाचे फायदे

(2) स्वयंपाकिणीचे मनोगत

(3) जगी सर्व सुखी असा कोण आहे ?

4. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पत्र लिहा : **5**

(1) विनय/अनन्या बुलबुले, अमर सोसायटी, एरंडवणे, पुणे-4 येथून आपल्या भागात वारंवार वीज खंडित होते याबद्दल विभागीय अधिकारी, विद्युतपुरवठा केंद्र, पुणे-30 यांना पत्र लिहून तक्रार करतो/करते.

(2) गिरीश/संध्या एकबोटे, ग्रंथालय प्रतिनिधी, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली-16 येथून महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी विश्वकोशाचे खंड सवलतीच्या दराच्या योजनेत मागवत आहे.

## Section-C

5. (a) खालील प्रश्न सूचनांप्रमाणे सोडवा (कोणतेही **पाच**) : **5**

1. सकाळपासून काम करून ठीणाताई दमल्या. (विशेषनाम ओळखा)
2. गिझर खूप वेळ चालूच राहिला होता. (विशेषण ओळखा)
3. मी मांजराच्या अंगावरून हात फिरवला. (शब्दयोगी अव्यय ओळखा)
4. प्रवासात स्वतः ची काळजी घे. (सर्वनाम ओळखा)
5. "मला नाही हे पटत !", तो हळूच पुटपुटला. (क्रियाविशेषण ओळखा)
6. आई ग ! केवढी जोरात ठेच लागली । (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(b) कंसातील सूचनेनुसार प्रयोग बदला (कोणतेही **तीन**) **3**

1. दुकानातील विक्रेत्या मुली चटपटीतपणे माल दाखवत होत्या. (कर्मणी प्रयोग करा.)
2. त्याने मोबाइलवर पटापट फोटो काढले. (कर्तरी प्रयोग करा.)
3. तिने मनोभावे देवांची पूजा केली. (भावे प्रयोग करा.)
4. तबलावादकाने तिच्या गायनाला सुरेख साथ केली. (कर्तरी प्रयोग करा.)

(c) सूचनेनुसार सोडवा : **3**

1. संध्याकाळी पाहुणे येणार म्हणून ती घर आवरत आहे. (काळ ओळखा)
2. आज जेवणात पालक-पनीर ची भाजी केली आहे. (भविष्यकाळ करा.)
3. रोज पहाटे मशिदीतून अजान ऐकू येते. (काळ ओळखा.)

(d) लिंग बदला : **2**

1. लेखक
2. मासोळी
3. बोका
4. बाप

(e) वचन बदला : **2**

1. तळे
2. बायका
3. पाने
4. दही

(f) समानार्थी शब्द लिहा : **1**

1. भांडण
2. समुद्र

(g) विरुद्धार्थी शब्द लिहा : **1**

1. रडवेला
2. विपुल

(h) वाक्प्रचारांचा खालील वाक्यांमध्ये योग्य वापर करा : **1**

(नशीब, फळफळणे, डोक्यावर मिऱ्या वाटणे)

1. राधा बाईंची सून त्यांना फारच त्रास देते.
2. लॉटरीचा निकाल लागला आणि काकांचे भाग्य पालटले.

(i) अचूक शब्द ओळखा व लिहा : **1**

1. जनगणना
2. जणगणना
3. जनगनणा

## Section-D

6. (a) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : **4**

   (1) "एक मनुष्य अखंड जेवतो आणि दुसरा सतत उपाशी राहतो हे निसर्गाला कधीच मंजूर नाही."

   (2) "कारण माझा उपयोग जे व्यवस्थित करतात, तेच मोठे होतात. ज्ञानी होतात, विद्वान होतात."

   (3) "हो ना बाई, तुम्ही सगळया होतात म्हणून निभावलं हो."

   (b) कंसातील योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा : **1**

   "अरे, बापाचा फोटो घरात लावण्यासाठी (फॅशन/सवड/परवानगी) असावी लागते ?"

7. (a) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **50** ते **60** शब्दांत लिहा : **8**

   (1) 'तोच असतो मोठा, ज्याचा मित्र पुस्तकराव' असे का म्हटले आहे ?

   (2) बाबा आमटे यांची संवेदनशील वृत्ती स्पष्ट करा.

   (3) 'ईद' या सणाच्या दिवशी लेखिका आशा आपराद यांच्या घरी वातावरण कसे असे ?

   (b) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा : **2**

   (1) मोठी माणसं पुस्तकाला कसा त्रास देतात ?

   (2) मानसीला कोणाची चाहूल लागली ?

   (3) येणारी पिढी कशी असली पाहिजे ?

8. (a) खालीलपैकी कोणत्याही **एका** पद्यांशाचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा : **4**

   (1) "इंद्रधनूचे रंग वेगळे, तरिही त्यांची एक कमान"

   (2) "गावापासून केले दूर वीतभरच्या पोटाने
   तरी ओळख होतसे अमुची गावाच्या नावाने"

   (3) "जमीनदोस्त व्हावीत
   घरे आणि शहरे
   पुन्हा निर्माण व्हावीत
   एकाच आकाराची"

   (b) कंसातील योग्य पर्याय निवडून ओळ पूर्ण करा. **1**

   "मिळवू आपण आपले (अधिकार/हक्क/लाभ)"

9. (a) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **50** ते **60** शब्दांत लिहा : **8**

(1) कवीने माणसाकडून कोणती अपेक्षा केली आहे ?

(2) कवयित्रीने एकत्वाचे कोणते विचार कवितेतून व्यक्त केले आहेत ?

(3) 'गाव' या कवितेतील मध्यवर्ती कल्पना काय आहे ?

(4) अन्यायाविरोधात लढणारी स्त्री कोणकोणत्या रुपांत कवितेतून व्यक्त झाली आहे ते सोदाहरण स्पष्ट करा.

(b) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : **2**

(1) कवितेतील स्त्रीला समता निर्माण व्हायला काय करावे असे वाटते ?

(2) कवीच्या मते प्रलयामुळे कोणते नाते अतूट व्हावे ?

(3) 'देश हाच आमचा परमेश्वर' हे सांगण्यासाठी कोणकोणते शब्द कवयित्रीने वापरले आहेत ?

10. (a) खालील पठित उताऱ्यातील ओळी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

सकाळच्या सूर्य उगवायच्या वेळी पैलवानांचे समूह हातात पितेळची, कल्हई केलेली छोटी बादली घेऊन जा ताना दिसतात.

पैलवान दूधकट्टयावर मिळणारं म्हशीचं ताजं आकडी (निरसं) दूध विकत घेतात आणि तिथंच पिऊन पुढं आखाड्यात मेहनतीसाठी जातात. पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जात असतात. कोल्हापूर शहरांच हे सांस्कृतिक वैशिष्ट्य महाराष्ट्राच्या इतर कोणत्याही शहरात दिसणार नाही. एकट्या कोल्हापुरात जेवढ्या तालमी (आखाडे) आहेत तेवढ्या तालमी कोल्हापूरपेक्षा कितीही पटींनी मोठ्या असलेल्या महाराष्ट्राच्या कोणत्याही शहरात किंवा महानगरात दिसणार नाहीत. कोल्हापुरी संस्कृतीचे हे वैशिष्ट्य आहे.

तुम्ही पाहिलेल्या एखाद्या गावातील सांस्कृतिक वैशिष्ट्य असलेल्या दृश्याचे वर्णन करा. **4**

**किंवा**

एका पैलवानाच्या दिनचर्येचे वर्णन करा.

(b) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **50** ते **60** शब्दांत लिहा : **6**

(1) आपण खोटारडेच आहोत असे चिनारला का वाटले ?

(2) जुईचे आई बाबा घरी कोणकोणती कामे करतात ?

8


8